| | |
|---|---|
| | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२०१५</u>**<br>श्री. शंकर श्रीपती पाटील<br>वि.<br>दत्तात्रय गणपती पाटील वगैरे |

# नि. १२४ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतीदाव्यातील वादी याने "विलंब माफी" करीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जावर मुळच्या वादीने म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिदाव्यातील अर्जदार तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की प्रतिदाव्यातील वादी क्र. ९ रघुनाथ शंकर पाटील हे दि. २९.९.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. परंतु त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता १२ महिने ९ दिवस इतका विलंब झालेला आहे. मुळातच रघुनाथ पाटील व त्यांच्या पत्नी यशोदा रघुनाथ पाटील या देखील १०.०२.२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. मुळातच प्रस्तुत प्रतिदाव्यातील अर्जदार यांनी कोणताही जाणून बुजून विलंब केलेला नाही. तसेच वादी क्र. ९ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर येणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच प्रस्तुत वारस रेकॉर्डवर न आल्यास प्रतिदाव्यातील वादी यांच्या वारसांचे अपरिमीत नुकसान होणारे आहे. तसेच सदरचा अर्ज नामंजुर झाल्यास कायदेशीर गुंतागुत वाढणारी आहे. अंतिमत अर्जदार तर्फे वकील यांनी वारस रेकॉर्डवर घेणेकरीता झालेला विलंब माफ करणेत यावा अशी नम्र विनंती केली.

४. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की प्रस्तुत अर्जास कोणतेही संयुक्तिक कारण नाही. प्रतिदाव्यातील वादी यांनी जाणुनबुजून विलंब केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा. तसेच न्यायहितास्तव अर्ज मंजुर झाल्यास अर्जदार यांना दंड करण्यात यावा.

५. प्रस्तुत अर्ज, त्यावरील म्हणणे व इतर कागदपत्रांची छाननी केली असता हि गोष्ट दिसुन येते की प्रतिवादी याने प्रतिदावा हक्कज्ञापन व कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. मुळातच प्रतिदाव्यातील वादी याने रघुनाथ शंकर पाटील यांच्या मृत्यु दाखल्याची सहीसुद प्रत व यशोदा रघुनाथ पाटील यांच्या म्रत्यु दाखल्याची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. रघुनाथ शंकर पाटील हे दि. २९.०९.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येत आहे. तसेच यशोदा रघुनाथ पाटील या दि. १८.०२.२०२३ रोजी मयत झाल्याच्या दिसून येत आहेत. त्यामुळे एकंदरितच प्रतिदाव्यातील वादी यांना प्रस्तुत रघुनाथ व यशोदा यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास १२ महिन्याहुन जास्त कालावधी झाल्याचे दिसून येत आहे. परंतु दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई करीता असल्यामुळे प्रस्तुत वादी यांचे वारस हे गरजेचे पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र आहे असे वाटते. मात्र झालेला विलंब हा देखील दुर्लक्ष करता येणार नाही. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१. प्रतिदाव्यातील वादी यांचा अर्ज रक्कम रु. ५००/– मुळ दाव्यातील वादी यांना देण्याच्या अटीवर मंजुर करणेत येत आहे.**

**२. प्रस्तुत कॉस्ट भरणा झाल्यानंतर अर्जदार यांचा विलंब माफ करण्यात येईल.**

**सही/–**
**के. दि. काकतकर**
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा

पन्हाळा
दि. १२.०६.२०२५